# मराठी (प्रश्न-पत्र–I)

( साहित्य )

वेळ : तीन तास

कमाल अंक : 250

## प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

### उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, तिचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न अनुक्रमानेच गृहीत धरले जातील. एखाद्या प्रश्नाचा अंश जरी सोडविलेला असेल, तरी जर तो खोडलेला नसेल तर गृहीत धरला जाईल. कोणतेही पृष्ठ अथवा पृष्ठाचा काही भाग प्रश्नोत्तरपुस्तिकेत कोरा सोडला असेल, तर त्यावर काट मारावी.

# MARATHI (PAPER—I)

( LITERATURE )

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 250

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

### Please read each of the following instructions carefully before attempting questions

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (*150*) शब्दांत लिहा : 10×5=50

(a) 'भाषा म्हणजे विचार, भावना, अनुभव व कल्पना व्यक्त करण्याचे साधन' या विधानाची सार्थकता पटवून द्या.

(b) बोलीचे विशेष सांगून बोलीचे महत्त्व विशद करा.

(c) मराठी भाषेच्या प्रमुख बोली सांगून वऱ्हाडी बोलीचे विशेष सोदाहरण स्पष्ट करा.

(d) विभक्तीचे प्रकार प्रत्ययासह विशद करा.

(e) लोककथागीत म्हणजे काय हे सांगून लोककथागीताचे वैशिष्ट्ये नोंदवा.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) भाषा आणि समाज यांचा सहसंबंध उलगडून दाखवा. 20

(b) यादवकालीन मराठी भाषेचे वेगळेपण सोदाहरण स्पष्ट करा. 15

(c) लोकसाहित्याचे स्वरूप-विशेष विशद करा. 15

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) भाषाविज्ञानातील नोम चॉम्स्कीच्या भाषाविषयक संकल्पनाचे विवेचन करा. 20

(b) लोकरंगभूमीच्या स्वरूप-विशेषाची चर्चा करा. 15

(c) 'व्यावहारिक भाषेपेक्षा साहित्याची भाषा वेगळी असते' या विधानाची सार्थकता पटवून द्या. 15

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) सतराव्या शतकातील मराठी भाषेवरील प्रभावाची चर्चा करा. 20

(b) शब्दाच्या जाती सोदाहरण स्पष्ट करा. 15

(c) प्रयोगाचे प्रकार सांगून भावेप्रयोगाचे पोटप्रकार सोदाहरण लिहा. 15

## SECTION—B

**5.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (*150*) शब्दांत लिहा : 10×5=50

(*a*) महानुभाव संप्रदायातील साती काव्यग्रंथांचा थोडक्यात परिचय करून द्या.

(*b*) 'जातीहीनतेचे दुःख वारकरी संतांच्या अभंगातून प्रगट झाले आहे' याचे साधार विवेचन करा.

(*c*) लावणीचे रचना-विशेष सोदाहरण उलगडून दाखवा.

(*d*) उपयोजित समीक्षेचे कार्य स्पष्ट करा.

(*e*) ग्रामीण कवितेचा थोडक्यात आढावा द्या.

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) 'महात्मा जोतीराव फुले यांची साहित्यविषयक कामगिरी मोलाची आहे' या विधानाची सार्थकता स्पष्ट करा. 20

(*b*) पंडिती काव्याचे स्वरूप आणि विशेष सोदाहरण स्पष्ट करा. 15

(*c*) साहित्यसमीक्षेचे स्वरूप सांगून ठळक उद्दिष्टे नोंदवा. 15

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) साठोत्तर मराठी कादंबरीचे योगदान अधोलेखित करा. 20

(*b*) स्वातंत्र्यानंतरच्या मराठी कथेचे बदलते स्वरूप उलगडून दाखवा. 15

(*c*) दलित आत्मकथनांचे भारतीय साहित्यातील योगदान स्पष्ट करा. 15

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) 'स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेने सामाजिक जाणिवेची व्यापक अभिव्यक्ती केली आहे' या विधानाची सार्थकता सोदाहरण स्पष्ट करा. 20

(*b*) 'मराठीतील स्त्रीवादी कादंबरी म्हणजे स्त्रीच्या आधुनिकवृतीची नवी सूत्रे आहेत' याचे सोदाहरण विवेचन करा. 15

(*c*) 'सामाजिक चळवळीच्या परिणामातून साहित्य चळवळी प्रभावित झाल्या' हे साठोतरी साहित्यप्रवाहाच्या संदर्भाने स्पष्ट करा. 15

★ ★ ★